आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

या अंकात
पान ०४ जग विख्यात केमिकल ॲनालिस्ट
पान ०६ 'कोमसाप' चे मॉरिशस संमेलन झोकात साजरे
पान ०८ गं साजणी......
पान ०९ Business Opportunities in Cyber Security



पान ०७ अरविंद मुखेडकर यांना 'संगीत भास्कर' उपाधी

वर्ष ३३ वे अंक दुसरा पृष्ठे १० फेब्रुवारी२०२४ www.parlekar.com
Registered-RNI no. 54781/92

# 'पार्ले स्वरवसंत' २०२४- अभिजात स्वर मैफिल

सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका, संगीतकार श्रीमती गौरी पाठारे गेली अनेक वर्षे, 'पार्ले स्वर वसंत' ह्या संगीत महोत्सवाचे आयोजन करत आहेत. २०२४ चा कार्यक्रम गौरी पाठारे आणि रामांजनेय देवस्थान यांनी एकत्रितपणे आयोजित केला होता. दरवर्षी संगीत प्रेमी या महोत्सवाची मोठ्या उत्सुकतेने वाट पहात असतात.

या महोत्सवाचे उद्दिष्ट हे प्रतिभावान, नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे असले तरी



अनेकदा प्रतिथयश कलाकारही या महोत्सवात सादरीकरण करतात.

यंदा दिनांक ३ आणि ४ फेब्रुवारी अशा दोन दिवसात हा महोत्सव आयोजित करण्यात आला. पहिल्या दिवशी, श्री प्रवीण गावकर यांचे गायन, पं. हिंडोल मुजुमदार यांचे तबला वादन आणि श्रीमती कलापिनी कोमकली यांचे गायन आयोजित करण्यात आले.

मोजके शब्द वापरत कार्यक्रमाचं सूत्र संचालन श्रीमती नीरजा यांनी प्रभावीपणे केलं. या महोत्सवात साथ संगत करणारे कलाकारही उच्च क्षमतेचे, जाणकार असतात. ज्यांच्या सहकार्याने कार्यक्रम कमालीचा रंगला.

सारंगी: श्री संगीत मिश्रा, श्री फारुख लतीफ खान.

हारमोनियम: श्री निरंजन लेले, श्रीमती सुप्रिया मोडक जोशी.

तबला: श्री. मंदार पुराणिक, श्री. पुष्कराज जोशी. या कलाकारांच्या बरोबर गौरी पाठारे यांच्या शिष्य मंडळीनेही साथ दिली.

दुसऱ्या दिवसाचा पहिला कलाकार होता विशीतला, अगदी तरूण असा विराज जोशी. (भिमसेन जोशींचा नातू.)

४ फेब्रुवारी हा दिवसही विशेष महत्वाचा कारण ह्याच दिवशी भारतरत्न पंडित भीमसेन



जोशी यांची जयंती असते.

विराजने, 'सुमिरन तेरो नाम', 'पायलिया झनकार मोरी' ह्या बोलात, 'राग पुरिया धनश्री' ने सुरुवात करून, 'माझे माहेर पंढरी' या त्याच्या आजोबांच्या म्हणजेच पं. भीमसेन जोशींच्या आवडत्या अभंगाने समापन केले.

हा दिवस चिरस्मरणीय झाला त्याचं कारण होतं गौरी पाठारे यांनी यावर्षी पासून सुरू केलेला, स्व. डॉ. दामलेंच्या नावाचा सन्मान पुरस्कार! विराज जोशी हा सन्मान पुरस्कार प्राप्त करणारा पहिला कलाकार ठरला.

दुसऱ्या दिवशीचे दुसरे कलाकार होते सुप्रसिध्द व्हायोलिन वादक पं. अतुल उपाध्ये. त्यांच व्हायोलिन कमालीच 'बोलकं' होतं. त्यांच वादन हे कमी वेळात प्रभावी सादरिकरण कसं असावं त्याचं प्रात्यक्षिकच होतं. राम भजनाने त्यांनी त्यांच्या वादनाची सांगता केली.

कार्यक्रमाची सांगता 'पार्ले स्वरवसंत' च्या आयोजिका गायिका श्रीमती गौरी पाठारे यांच्या गायनाने होणार होती, ज्याची श्रोते कमालीच्या उत्कंठतेने वाट पहात होते.

गौरी पाठारे यांचा 'सिया संग झुले बगियाँमे राम ललना' हा झुला श्रोत्यांना झुला झुलण्याचा आनंद देऊन गेला.

भारतीय संगिताचं जतन, संवर्धन आणि नव्या पिढीला अभिजात संगीताची ओळख हे काम गौरी पाठारे या 'पार्ले स्वरवसंत' महोत्सवाच्या उपक्रमाने फार मनापासून करत आहेत.




## संपादकीय

मुक्या प्राण्यांवर दया करा, प्रेम करा, असे आपल्याला शाळेतच शिकवले जाते आणि ते बरोबरच आहे. आपल्या संस्कृतीत तर प्राणिमात्रांबरोबरच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' अशी संकल्पना मांडली आहे. आपण या ग्रहावरील निसर्ग चक्राचेच एक घटक आहोत व त्यानुसारच आपली वागणूक राहिली पाहिजे ही भावना त्यामागे आहे. आपण बघतो कि माणूस सोडून इतर सर्व प्राणी निसर्ग चक्राप्रमाणेच वागतात, निसर्गाशी मैत्री करून राहातात, निसर्ग चक्रातील आपले कर्तव्य न चुकता पार पाडतात. माणूस हा एकमेव असा प्राणी आहे कि जो निसर्गाशी वैर करून राहतो, त्याचा नाश करतो.

हे सर्व 'तत्वज्ञान' आज आठवण्याचे कारण कि नुकतीच आमच्या सहनिवासात श्वान विरोधी बैठक झाली. सहनिवासातील एक दोन घरी असलेल्या श्वानांविषयी सहनिवासाची भूमिका काय असावी ह्याविषयीची ही बैठक होती. दोन्ही पक्ष तावातावाने भांडत होते आणि खरे सांगू, मला दोघांचेही थोडेथोडे पटत होते. अस्मादिकांना काही महिन्यांपूर्वी श्वानदंशाचा प्रसाद मिळाला होता पण तो अपक्ष (आय मीन भटक्या) श्वानाकडून. या भटक्या श्वानांचा बंदोबस्त केला पाहिजे ह्याबाबत मात्र दोन्ही पक्षांचे एकमत होते. ह्याबाबतीत कायदा काय सांगतो ह्याची माहिती घेण्याचे ठरले. अनेक वर्षांपूर्वी पार्ल्यातील भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची मोहीम स्थानिक प्रशासनाने हाती घेतली होती. तसा विचार करणे आजही संयुक्तिक आहे. इतरत्र रात्री एकट्या दुकट्या माणसाला चोरांची भीती वाटते मात्र पार्ल्यात रात्री एकट्या माणसाला कुत्र्यांची भीती वाटते. हे शहर माणसांच्या मालकीचे आहे, प्राण्यांच्या नव्हे, ही भूमिका सुद्धा बैठकीत सर्वांना मान्य नव्हती.

पाळलेल्या प्राण्यांच्या बाबतीत सुद्धा घनघोर चर्चा झाली. त्यांनी सहनिवासात विष्ठा करू नयेत, लोकांच्या (विशेषत: मुलांच्या) अंगावर भुंकू नये, अश्या अनेक (जाचक) अटी श्वान / मार्जर पालकांवर घालण्यात आल्या पण त्यांनी त्या निर्भीडपणे फेटाळून लावल्या. मात्र घरच्या प्राण्यांची नियमितपणे वैद्यकीय तपासणी करणे, वेळच्यावेळी लसीकरण करणे, अश्या काही गोष्टी सर्वांनीच मान्य केल्या. पाळीव प्राण्यांमुळे घरचे वातावरण सुधारते, मनातील प्रेम भावनेला वाव मिळतो, असेही मुद्दे चर्चेत आले.

बैठकीच्या शेवटी दोन्ही पक्षांचे एकमत झाले पण आमच्या घरी मात्र कुत्रा किंवा मांजर पाळण्यावरून भांडण सुरु झाले. मंडळी, तुम्हाला काय वाटते ? आणावा काय एखादा pet ?


**पार्लेकर**

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


# उत्तुंग शिखरांकडे अखेरचे प्रयाण ..


आभाळा एवढं उत्तुंग कार्यकर्तुत्व करून अनंतात विलीन झालेल्या या लोकविलक्षण व्यक्तिमत्वाबद्दल मोजक्या शब्दांत लिहिणं, हे शिवधनुष्य पेलण्या एवढंच अवघड आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातलं एक चैतन्यशिल, व्यासंगी आणि समृद्ध अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे माधावराव! मराठी रंगभूमीवर स्वातंत्र्यवीर सावरकरांची तेजस्वी भूमिका साकार करायची विलक्षण प्रतिभा असलेला आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांनाच आयुष्याचं भागध्येय मानणारा मनस्वी रंगकर्मी.



त्यांनी साकारलेल्या 'सागरा प्राण तळमळला' आणि 'अनादि मी ! अनंत मी !' या नाट्यकृतीतील हिंदुत्वाच्या ओजस्वी विचारांनी अबाल-वृद्धांनाभारावून टाकलं. रंगभूमी बरोबरच अनेक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक कार्य त्यांच्या हातून भरभरून घडावं हे विधिलिखित असावं. यासाठी आयुष्यातील प्रत्येक वळणावर योग्य त्या व्यक्तींचा सहवास भाग्य योगाने त्यांना मिळत गेला. याला पूरक असलेली असामान्य गुण ग्राहकता, मार्मिक विनोदबुद्धी आणि कोणाशीही सहज संवाद साधायची जगावेगळी हातोटी त्यांच्याकडे होती. अत्यंत गरीबीतून आलेल्या पण आयुष्याशी हसत हसत संघर्ष करणाऱ्या माधवरावांना संसारात सुखाने साथ करणारी सात्विक, सुमधुर गळ्याची सहचारिणी 'आशा' लाभली. त्याच बरोबर या हिऱ्याची पारख करणारे दोन रत्नपारखीत्यांच्या आयुष्यात यावे ही नियतीचीच योजना असावी. हे रत्नपारखी होते विख्यात जर्मन दिग्दर्शक 'फिटज् बेनेविटज्' आणि श्रीकृष्ण उर्फ मनू काका पंडित.

त्यांच्या संघर्षमय जीवन प्रवासाचा थक्क करणारा आलेख 'खरं सांगायचं तर ..' (स्मरणरंजन) या त्यांच्या आत्मचरित्रातून उलगडत जातो. १९६८साली दिल्लीच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा मध्ये प्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक इब्राहिम अलकाजी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक इंग्रजी नाटकांमध्ये प्रमुख भूमिका केल्या. त्याच दरम्यान 'फिटज् बेनेविटज्' त्यांना भेटले आणि त्यांच्या बरोबर 'फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड' हे आयुष्यभराचं नातं निर्माण झालं. जर्मन नॅशनल थिएटरमध्ये जागतिक नाटक अभ्यासासाठी माधवरावांना शिष्यवृत्ती मिळाली. सांगली जिल्ह्यातील जायगव्हाण या छोट्या खेड्यातला हा जिद्दी प्रतिभावान युवक, 'अजब न्याय वर्तुळाचा' नाटकातील सहदेवाची भूमिका साकारून जर्मनीत झेंडा रोवून आला.

अभिजात नाट्य, अभिनय, नृत्य , नेपथ्य, लेखन याची विलक्षण जाण असलेल्या माधवरावांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर आधारित अत्यंत तेजस्वी आणि समृद्ध अनुभव देणारी नाट्यकृती 'अनादिमी ! अनंत मी!' रंगमंचावर आणली. राष्ट्रप्रेमासाठी तरुण पिढीत नवचैतन्य निर्माण केलं. या नाटकाच्या लेखनाबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. या नाटकाचा अमेरिकेतील पहिला 'द्विपात्री' प्रयोगबघायला आलेल्या मनूकाका पंडितांचं लवृत्ती मनू काकांना प्रभावित करून गेली. त्या छोट्या भेटीतच दोन दशकांहून अधिक काळ सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य ठरलेल्या 'उत्तुंग सांस्कृतिक परिवार' संस्थेची बीजे रुजली होती. याच वेळी माधवराव देना बँकेतील नोकरी आणि संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळत होते. बँकेच्या सांस्कृतिक विभागाला आंतर बँक नाट्यस्पर्धांमध्ये त्यांनी अनेक सन्माननीय पारितोषिके मिळवून दिलीच शिवाय देना बँकेत अवघ्या तीन वर्षांमध्ये ३३ कोटी रुपयांची सरकारी कोअर डिपॉझिट ठेव




मिळविण्याचा विक्रम केला. संसारवेली वर ओमकार आणि वेदश्री हि सुंदर फुले फुलत असताना गायिका आशा खाडिलकर हे नाव पण गायन क्षेत्रातील अग्रगण्य कलाकारांच्या यादीत दिसू लागलं होतं. हि सगळी तारेवरची कसरत सांभाळताना आदर्श पिता आणि पती या भूमिकांसाठी हसतमुखाने पडेल ती जबाबदारी त्यांनी स्वीकारली.

कलासंपन्न, कलाव्यासंगी आणि कलाप्रेमी खाडिलकर दांपत्य स्वत: उत्तम कलाकार होते. तरीही फक्त आत्मकेंद्रित न राहता समाजातील संगीत, साहित्य, नाट्य, वक्तृत्व, नृत्य, तमाशा, लोककला, लोकसंगीत, भजन कीर्तन, योग विद्या अशा अनेक क्षेत्रांमध्ये विशेष कार्य केलेल्या आणि वेळप्रसंगी उपेक्षित राहिलेल्या कलाकारांचा यथोचित गौरव उत्तुंग संस्थेच्या माध्यमातून त्यांनी २९ वर्षे अव्याहत केला. हे सगळं रसिकांच्या समोर विनामूल्य सादर केलं. वार्षिक जीवन गौरव, सेवा गौरव, भाऊबीज, संगीत नैपुण्य, राष्ट्रभिमान असे अनेक पुरस्कार आणि शिष्यवृत्ती देऊन गुणी जनांना आणि सेवाभावी व्यक्तींना सन्मानित केलं.त्यांच्या या नि:स्वार्थ सेवेची पावती उत्तुंग परिवाराच्या कार्यक्रमात तोबा गर्दी करून रसिकांनी कायम दिली. ५ नोव्हेंबर १९९४ रोजी हरिभक्त पारायण कीर्तनकार बाबा महाराज सातारकर आणि त्यांचे ४० टाळकरी यांच्या कीर्तनाने उत्तुंगच्या कार्यक्रमाची अविस्मरणीय सुरुवात झाली. त्या नंतर उत्तुंगच्या व्यासपीठावर हजेरी लावलेल्या व्यक्तींची यादी म्हणजे महाराष्ट्राचा सांस्कृतिक कोषच ठरावा. शब्द मर्यादेमुळे त्यांचा उल्लेख करणं कठीण होतं आहे.


प्रतिभावंतांना कलाश्रय देणारं 'उत्तुंग' हे खऱ्या



अर्थाने संस्थान म्हणायला हवं. तिथे फक्त माधवरावांचीच दिलदार राजेशाही चालायची . हळूहळू ओमकार खाडिलकर आणि वेदश्री खाडिलकर ओक या त्यांच्या कलागुण संपन्न आपत्यांनी 'उत्तुंग' कार्य पुढे नेण्यास सुरुवात केली आहे. नृत्य कलाकार स्नुषा प्राजक्ता आणि उत्तम संवादिनी पटू जावई आदित्य ओक, दोन्ही नाती आदिती आणि वैष्णवी अशा कलासक्त परिवाराची त्यांना साथ आहे. माधवराव वयाची पंच्याहत्तरी साजरी करताना सुखी संसार आणि 'उत्तुंग' वृक्षाच्या शाखांचा विकास पाहून ते म्हणाले होते की ''मी तृप्त आहे.'' पण खरं सांगायचं तर ते कायम तृप्त आणि कृतज्ञ होते म्हणूनच एवढं मोठं काम नि:स्वार्थी बुद्धीने आणि समर्पण वृत्तीने करू शकले. 'उत्तुंग' चे राज्य चालवणारा असा भोगशून्य राजा आजच्या जगात सापडण दुर्मिळ आहे. त्यांच्या अंत्यदर्शनाला गेलो तेव्हा पण चेहेऱ्यावर तीच तृप्तता होती. आशा ताईनीशब्दबद्ध केलेल्या उत्तुंग संस्थेच्या ध्येयगीतातील ''उत्तुंग असे ते शिखर आम्हांला आहे गाठायचे!''

या ओळी म्हणत अखेरच्या प्रवासाला माधवराव रवाना झाले होते.

शिखरावर स्वागताला आलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर भेटीची पण ही तृप्तता असावी...!!!!




डॉ. कीर्ति सतीश आगाशे
९७६६६२८५१२

# संवादातून व्यसनमुक्ती

३ फेब्रुवारी रोजी ८६ वा व नववर्षाचा द्वितीय पार्लेकट्टा सामाजिक, सांस्कृतिक, सांगितिक, भ्रमंती आरोग्यशास्त्र याबरोबरच व्यसनाचं मानसशास्त्र याचंही भानही जपणारा व संवादातून नातं जोडणारा ठरला.

सरोद वादनातून श्री विवेक जोशी यांनी 'अनेक उपलब्ध उपचार पद्धतींप्रमाणे संगीताचेही मनुष्यप्राणी यांच्यावर होणारे दृश्य अदृश्य परिणाम हे अभ्यासले गेले आहेत.' याची एक झलक सादर करण्याचा प्रयत्न केला. याचबरोबर अनेक छोट्या मोठ्या कार्यशाळा घेऊन त्यांनी शास्त्रीय संगीताचा प्रसार करतानाच अनेक वेंगलेल्या मनांना तजेला द्यायचा नेक प्रयत्न देखील केला.

या कार्यक्रमाला मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका - सौ. मुक्ता पुणतांबेकर प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. 'मुक्तांगण पुणे' व्यसनं व गुन्हेगारीच्या गर्तेतून तीस सहस्त्राहून अधिक पीडितांना परत माणसांत आणून एक नव संजीवनी देणारी अग्रगण्य संस्था डॉ. अनिता अवचट व डॉ. अनिल अवचट यांनी १९८६ साली स्थापन केली. स्वभावाला औषध नाही हे मिथक खोटं ठरवत iMiracle is Every day affair in Muktangan' हे त्यांच मिशन स्टेटमेंट झालं.





''दारू, तंबाखू, ड्रग्ज अशा व्यसनांचे परीघ विस्तारताना त्यात मोबाईल, कॉंप्युटर यांचा अतीवापर यांचीही भर पडलीय. वय, लिंग आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थान या कक्षा भेदीत ही व्यसनं कळत नकळत नाजूक



मनोवृत्तीचा ताबा घेतात. त्यामुळे स्वास्थ्यावर होणारे परिणामही दूरगामी असतात. औषधं तात्कालिक उपयोगी ठरतात पण संवादाने नातं जोडत मातृत्वाची फुंकर घालत केलेले उपचार हे खचितच फलदायी ठरतात व ठरलेत.. मुक्तांगणचं हेच निर्भेळ यश म्हणावं लागेल.'' असं उत्तर मुक्ता पुणतांबेकर यांनी मुलाखती दरम्यान सांगितले.

मुलाखती दरम्यान त्या मुक्तांगणचा संपूर्ण प्रवास उलगडत होत्या. मुक्ता पुणतांबेकर यांची मुलाखात पार्ले कट्ट्याच्या प्रज्ञा काणे यांनी घेतली.



अमरेंद्र करंदीकर
९८२०० ९६२९९

# अंधेरी वाचनकट्टा रौप्य महोत्सव रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

रविवार दिनांक १७ डिसेंबर रोजी अंधेरी वाचन कट्ट्याचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम श्रोत्यांच्या मोठ्या उपस्थितीत चिल्ड्रन्स वेल्फेअर महाविद्यालय, यारी रोड, वर्सोवा येथे संपन्न झाला.

सुरूवातीला प्रदीप पाटील यांनी या



कार्यक्रमाची प्रस्तावना केली. सौ. स्मिता मनोज पाध्ये यांनी प्रमुख वक्त्या वंदना बोकील कुलकर्णी यांची ओळख करून दिली. रारंगढांग ही प्रभाकर पेंढारकर यांची अतिशय गाजलेली कादंबरी. १९८१ मध्ये या कादंबरीची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. ४२ वर्षांपूर्वी पेंढारकर यांनी लिहिलेल्या या कादंबरीवर आधारित दृकश्राव्य कार्यक्रम वंदना बोकील कुलकर्णी यांनी अतिशय उत्तम शब्दरूपाने सादर केला.

सुरूवातीला Border Roads Documentary ही ११ मिनिटांची फिल्म ज्यावर ही कांदबरी आधारित आहे ती दाखवण्यात आली. वंदना बोकील कुलकर्णी यांनी फिल्म मधील काही विशिष्ट भाग व त्या भागावर आधारित कादंबरीतील भागाचे वाचन असे स्वरूप केल्याने कार्यक्रम रंगतदार झाला. त्यात कादंबरीचा नायक लेफ्टनंट विश्वनाथ याच्या व्यक्तिरेखेत लेखक स्वत: किती उतरला आहे हेही त्यानी दाखवून दिले.

एका कॉलेजातील कार्यक्रमाला पेंढारकर जाऊ शकले नाहीत, तेव्हा त्यानी वंदना यांना कॉलेज मधील मुलांसाठी एक हृद्य पत्र दिले. त्या पत्राच वाचन करुन कार्यक्रम एका वेगळ्याच पातळीवर नेऊन वंदना यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

दुग्धशर्करा योग म्हणजे प्रभाकर पेंढारकर यांची भाची लेखिका यशोधरा काटकर, कन्या अदिती व पुतण्या समीर तसेच त्यांचे सहकर्मी सिनेमॅटोग्राफर अजित नाईक व राजेंद्र प्रकाशन च्या निलिमा कुलकर्णी या कार्यक्रमास आवर्जून हजर होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण तज्ञ अजय कौल होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी श्रीनिवास नार्वेकर होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शलाका कुलकर्णी यांनी केले.



प्रदिप पाटील
९८१९०६३०६९



# जग विख्यात केमिकल ॲनालिस्ट

सातासमुद्रापार

७० /८० च्या दशकात अनेक जणांना अमेरिका खुणावू लागली. काही जण स्वप्न पहात, थोड्या धास्तावलेल्या मनानी, उच्च शिक्षण घेण्यासाठी, अमेरिकेत गेले. तिथल्या वातावरणाशी जुळवतांना, आपली पाऊल वाट शोधत राहीले. काही परत आले, काही आपली वाट शोधून, इतरांना वाट दाखवण्या इतके तिथे रूळले, यशस्वी झाले. आपण या सदरात



पार्ल्यातून अमेरिकेत जाऊन, तिथे आपली वाट शोधणाऱ्यांची थोडी माहिती घेऊया.

पार्ल्यातले कवी आणि सामाजिक कार्यकर्ते असलेल्या नारायण जुवेकरांना पार्ल्यातील अनेक जण ओळखत असतील. प्रशांत हे त्यांचे धाकटे चिरंजीव . ही त्यांची पार्ल्यातली ओळख. अमेरिकेत ते प्रसिध्द आहेत 'PJ Juvekar' म्हणून.

प्रशांत हे पार्ले टिळक विद्यालयाचे विद्यार्थी ! लहानपणापासून काहीसे शांत, आणि अभ्यासू !

दहावी आणि बारावीत विशेष प्राविण्य मिळवून, ते माटुंग्याच्या UDCT कॉलेज मध्ये गेले. १९८८ मध्ये त्यांनी प्रथम श्रेणीत केमिकल इंजिनियर ही पदवी मिळवली. पुढे त्यांनी अमेरिकेतल्या 'युनिव्हर्सिटी ऑफ मेन' मध्ये स्कॉलरशिप मिळवून केमिकल इंजिनिअरिंग मध्येच 'मास्टर ऑफ सायन्स' केले. नंतर ४ वर्षे त्यांनी केमिकल इंडस्ट्रीजच्या 'बॉईज कॅसकेड' (' Boise Cascade') या प्रसिध्द कंपनी मध्ये नोकरी केली आणि १९९६ मध्ये कार्नेगी मेलन ( Carnegie Mellon) युनिव्हर्सिटीतून एम्. बी.ए. केले. त्यानंतर न्यूयॉर्क मधील सॅलोमन ब्रदर्स (Salomon Brothers) मधील, इक्विटी रिसर्च डिपार्टमेंट मध्ये, एनर्जी व केमिकल्स मध्ये त्यांनी रिसर्च केले. २२ वर्ष ॲनालिस्ट म्हणून तिथे त्यांनी काम केले. मध्यंतरी ही कंपनी सिटी ग्रूप ने ताब्यात घेतली .

२००७ मध्ये त्यांनी सिटीग्रूप च्या पेट्रोकेमिकल इंडस्ट्रिमध्ये रिसर्च ॲनालिस्ट व मॅनेजिंग डिरेक्टर म्हणून काम केले. ते व त्यांची टिम मिळून,जगातल्या सर्व मोठ्या पेट्रोकेमिकल्सचे आर्थिक विश्लेषण करतात व त्यात आढळलेल्या उणिवांवर उपायही सुचवितात.त्या व्यतिरिक्त ते अमेरिकेतल्या केमिकल कंपन्यांच्या शेअर्स मध्ये,आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना, योग्य सल्ला व मार्गदर्शन करतात.अशा असंख्य मार्गदर्शन करणाऱ्या ॲनालिस्ट मधून, Institutional Investor Magzine दरवर्षी, प्रत्येक विभागातील पहिल्या तीन ॲनालिस्टसची नांवे गौरवपूर्वक जाहीर करते. त्यात केमिकल विभागात सातत्याने अनेक वर्षे पहिल्या तीन क्रमांकात आणि आता काही वर्षे, पहिल्या क्रमांकावर येण्याचा बहुमान प्रशांत जुवेकरांनी पटकावला आहे. ही आपल्या पार्लेकरांना




अभिमानाची गोष्ट आहे. प्रशांत जुवेकर हे सध्या बॉस्टन कन्सलटींग ग्रूप (BCG) मध्ये आणि एका प्रायव्हेट इक्विटी कंपनी मध्ये सिनियर ॲडव्हायजर म्हणून कार्यरत आहेत. जिथून त्यांनी MBA केले त्या मान्यवर व उत्तम रॅंक असलेल्या, कार्नेगी मेलन युनिव्हर्सिटीच्या टेपर (Tepper) बिझनेस स्कूलच्या, अंलेम्नी बोर्डावर, न्यूयॉर्क विभागाचा प्रेसिडेंड म्हणून आता त्यांची निवड झाली आहे .



इलेक्ट्रिक कार व इलेक्ट्रिक बॅटरी ह्यावर त्यांचे संशोधन चालू आहे. अनेक युनिव्हर्सिटींच्या कॅम्पस मधून ,जॉब साठी विद्यार्थी निवडण्यासाठी ते जात असतात. लेक्चर्स साठी,सल्ले देण्यासाठी , जगभरातील पेट्रोकेमिकल उद्योगांचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी , ते जगभर सारखे फिरत असतात.

१५/१६ डिसेंबर मध्ये रत्नागिरीला 'जागतिक देवरूखे ब्राह्मण परिषद' भरली होती. तेव्हा उदघाटनाला प्रशांतना अध्यक्ष म्हणून मानाने बोलावण्यात आले होते. जरी इतकी वर्षे ते अमेरिकेत राहिले असले तरी भारताशी, भारतातील संस्थांशी इथल्या कुटूंबाशी, मित्र मंडळींशी, ते कायम संपर्क साधत असतात. सामाजिक बांधिलकी ते मानतात. विद्यार्थी सहाय्यक संस्था चे ऋण ते मानतात. म्हणूनच UDCT, अंधशाळा, विद्यार्थी सहाय्यक संस्था अशा अनेक संस्थांना, ते नेहमी आर्थिक मदत करतात.

विनोबांनी म्हटलेच आहे की ''ज्ञानमय नसे काही पवित्र दुसरे जगी'' म्हणूनच समाजातील प्रत्येक घटकाची शैक्षणिक कक्षा कशी उंचावत जाईल याकडे लक्ष देणे हेच आपले प्राथमिक कर्तव्य ठरते, असे ते मानतात.

गोल्फ, पिकलबॉल, क्रिकेट खेळणे हे त्यांचे छंद आहेत. हायकिंगची त्यांना विशेष आवड आहे. कितीही कामात व्यग्र असले तरी ते रोजचा व्यायाम चुकवत नाहीत. त्यांच्या पत्नी नीता ह्या ॲनालिटिकल केमिस्ट्रिमध्ये एम्एस् असून, केमिस्ट ते सिनियर रिसर्च सायंटिस्ट अशा चढत्या श्रेणीतल्या जबाबदाऱ्या सांभाळत, राष्ट्राध्यक्षांचे विशेष कर्तबगारीचे प्रशस्ती पत्रक व पारितोषिक स्विकारण्या इतक्या आपल्या क्षेत्रात चमकत आहेत.

ज्ञानार्जन इतकेच ज्ञानदान महत्वाचे असते हे त्या मानतात आणि त्यासाठी त्या न्यूजर्सीच्या कॉलेजमध्ये फिजिक्स व केमिस्ट्री शिकवतात. मुलगा करण आणि मुलगी रूही उच्च शिक्षण संपून आता नामांकित कंपनीत नोकरी करत आहेत .

प्रशांत व त्याच्या कुटूंबियांना त्यांच्या कार्यात असेच यश मिळो, अशा पार्लेकरांच्या तर्फे आपण शुभेच्छा देऊ या.



चित्रा मेहेंदळे
camehendale@gmail.com




COME HOME TO NASHIK'S MOST ULTRA LUXURIOUS PROJECT!
ANTONIA
4 & 5 BHK SKY VILLAS
SADGURU NAGAR, GOVIND NAGAR, NASHIK
BIG SIZE HOMES
AREA FROM - 2842 SQ. FT.
Carve a life of Luxury and Abundance at Antonia - The Sky Villas by Ravi Mahajan Builders and Developers at the most premium location of Govind Nagar. Equipped with stylish amenities, Antonia is the only project that offers 4 & 5 BHK spacious Sky villas just the way you have dreamt. With three side open structure, your new homes promise to keep you fresh with ample ventilation and privacy.
PROJECT APPROVED BY
SBI
HDFC HOME LOANS apni jagah banao
ICICI Bank Home Loans
बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
SITE ADD - CCM Link Road, Sadguru Nagar, Govind Nagar, Nashik
9011 076 019
RAVI MAHAJAN BUILDERS & DEVELOPERS
सुख समृद्धीच्या चार भिंती, प्रत्येकासाठी
www.ravimahajan.com
Office- 113 to 116, The Presidency, Old Agra Road, Gadkari Chowk,near Kalika Mata Mandir, Nashik -2
Member of CREDAI NASHIK METRO
P51600034689

# 'कोमसाप' चे मॉरिशस संमेलन झोकात साजरे

डिसेंबर २०२३ मध्ये मॉरिशस येथे पार पडलेल्या 'कोमसाप' (कोकण मराठी साहित्य परिषद) च्या १७ व्या आंतरराष्ट्रीय हृदयंगम मराठी साहित्य संमेलनात विलेपार्ले येथील लता गुठे यांच्या 'भरारी प्रकाशना' च्या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

या पुस्तकांमध्ये पार्लेकर लता गुठे लिखित 'भाव-विभोर' या लेखसंग्रहाचा, उषा परब लिखित 'स्वरसम्राज्ञी' या एकांकीकेचा, पार्लेकर प्रशांत राऊत लिखित 'मिस्ड कॉल' या कथासंग्रहाचा आणि 'बोली अबोली' या







वाडवळी बोली भाषेतील कवितासंग्रहाचा समावेश आहे. या चारही पुस्तकांचं प्रकाशन संमेलनाच्या दुस-या दिवशी, संमेलनाचे अध्यक्ष मा. विजय कुवळेकर, कोमसापच्या अध्यक्षा मा. नमिता कीर, कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, मॉरिशसचे खासदार असले टिटू, मॉरिशस मराठी स्पिकिंग युनियनचे अध्यक्ष नितिन बापू इत्यादी मान्यवरांच्या हस्ते झाले. लता गुठे, उषा परब, प्रशांत राऊत आणि प्रीति राऊत प्रकाशनाच्या वेळी उपस्थित होते.

हे आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलन कोमसापचे संस्थापक मा. मधु मंगेश कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, कोमसाप आणि मॉरिशस सरकार, मॉरिशस येथील मराठी स्पिकिंग युनियन, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन, मॉरिशस मराठी भाषा संघ, मॉरिशस मराठी साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या संमेलनास महाराष्ट्रातील १०० हून अधिक मान्यवर आणि नामवंत साहित्यिक उपस्थित होते. उपस्थितांमध्ये मा. विनय सहस्त्रबुध्दे, मा. आमदार संजय केळकर, कोमसापचे विश्वस्त रमेश कीर, नाट्यकर्मी अशोक समेळ, राजन बने, जयु भाटकर, कवी अशोक नायगांवकर, रेणू दांडेकर, राजा दांडेकर इत्यादी मान्यवरांचा समावेश होता.

साहित्य संमेलनाची सुरूवात ग्रंथदिंडीने, जल्लोषात करण्यात आली. संमेलनात परिसंवाद, काव्यसंमेलन, एकांकिका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि अध्यक्षीय तसेच प्रमुख पाहुण्यांची भाषणे इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल होती.

कार्यक्रमाच्या शेवटी मॉरिशसमधील कलाकारांनी कोकणातील जाखड नृत्य सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली.




दिडशे वर्षांपूर्वी मॉरिशस येथे गेलेल्या पुर्वजांपासून ते आजच्या मराठी पिढीचे नेतृत्व करणारे निशी हिरू, भालचंद्र गोविंद आणि त्यांचे सहकारी मॉरिशसमध्ये मराठी भाषा आणि संस्कृती जपण्याचं आणि संवर्धनाचं काम करीत आहेत. मॉरिशस येथील महात्मा गांधी शैक्षणिक संस्थेत मराठी भाषेत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत.

मॉरिशसमध्ये मराठी भाषेव्यतिरिक्त क्रियोल, फ्रेंच आणि इंग्रजी भाषांचा वापर होतो. मॉरिशसमध्ये महाराष्ट्र दिन, शिवजयंती, गणेशोत्सव, गुढी पाडवा इत्यादी उत्सव मराठी बांधवांतर्फे दरवर्षी थाटामाटात साजरे केले जातात. मॉरिशसमध्ये मराठी वाचन संस्कृती वृध्दिंगत होण्यासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांनी या संमेलनाच्या निमित्ताने एक हजाराहून जास्त पुस्तके मॉरिशसला भेट दिली.

या संमेलनाचं फलित म्हणून मॉरिशस सरकार, मॉरिशसमधील मराठी बांधव आणि महाराष्ट्र सरकार, भारत सरकार आणि भारतातील मराठी बांधव यांचे संबंध अधिक दृढ आणि बळकट झाले आहेत. त्यामुळेच दोन्ही देशात मराठी भाषा आणि संस्कृतीच्या जपणूकीची, संवर्धनाची आणि वाढीची मुहूर्तमेढ एकत्रितरित्या रोवली गेली आहे. सर्व मान्यवरांचे आणि साहित्यिकांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा !!!



प्रशांत राऊत
९८२०६९४६८०

## नवीन वर्षाची साहित्यिक भेट

२४ जानेवारी रोजी नाडकर्णी सभागृह येथे प्रसिद्ध लेखिका विद्या पेठे यांची 'ललित रंग' आणि 'गोंधळात गोंधळ' (बालनाटिका) ही दोन पुस्तकं ज्येष्ठ लेखक व समीक्षक अशोक बेंडखेळे यांच्या हस्ते प्रसिद्ध झाली. पुस्तकाचे प्रकाशन करताना श्री बेंडखळे म्हणाले, 'लेखिकेची संवेदनशीलता, प्रेमळ स्वभाव, बहुश्रुतपणा या साऱ्याचे दर्शन बारा







ललितलेखांमधून घडते.' याचबरोबर त्यांनी 'वेणी' आणि 'माझ्या ग अंगणी' या दोन लेखांबद्दल सविस्तर विवेचन देखील केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अल्पना कशाळकर यांनी केले. त्याचबरोबर संघटनेचे अध्यक्ष विजय पंतवैद्य, कार्यवाह प्रतिभा सराफ आणि सोबतीचे अनेक सभासद प्रकाशन सोहळ्याला उपस्थित होते.

त्रइसवी सनापूर्वीचे पाच, सहा सहस्त्रक ते एकविसाव्या शतकातील चालू वर्ष इतका मोठा कालपट लेखिकेने या पुस्तकात शब्दबद्ध केला आहे. जीवनातील अनेक अंगांना स्पर्श करणारं हे पुस्तक रंजक, औत्सुक्य वाढविणारं आहे. ओघवत्या शैलीत लिहिलेल्या बारा लेखांचा हा संग्रह म्हणजे चतुरस्त्र लेखिका विद्या पेठे यांच्याकडून वाचकांना मिळालेली नवीन वर्षाची भेट आहे. या पुस्तकातील कोणताही लेख वाचायला घ्यावा व पुस्तक आवडीने पूर्ण वाचले जाणार यात शंकाच नाही.




## अशोक बेंडखळे यांची 'विश्वस्त' म्हणून फेरनिवड

ज्येष्ठ लेखक अशोक बेंडखळे यांची अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या संमेलन महाकोषावर विश्वस्त म्हणून नुकतीच फेरनिवड झाली. मुंबई मराठी साहित्य संघातर्फे ही निवड झाली असून ती पाच वर्षांसाठी आहे. श्री.बेंडखळे



यांनी गेली सतरा वर्षे साहित्य संघाचे नियामक मंडळ व कार्यकारी मंडळ सदस्य, साहित्य मुखपत्राचे संपादक, विविध निवड समित्यांचे सदस्य, अशा विविध जबाबदारीच्या पदांवर काम केले आहे. सध्या बेंडखळे साहित्य शाखेचे कार्यवाह म्हणून काम पहात आहेत. 'विश्वस्त' म्हणून त्यांची महामंडळ संमेलन महाकोषावर दुसर्यांदा निवड झाली आहे. श्री.बेंडखळे यांची विविध विषयांवर ४१ पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यांना आजपर्यंत बारा साहित्य पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

# अरविंद मुखेडकर यांना 'संगीत भास्कर' उपाधी

संगीत क्षेत्रात सदोदित क्रिएटिव्ह नि लोकरूचिपूर्ण असं करत राहणारे, एका पाठोपाठ एक अशा नवनवीन भन्नाट कल्पनांना वास्तवात आणणारे 'आम्ही पार्लेकर'च्या फाऊंडर्स टीम पैकी एक व ज्येष्ठ संगीतकर्मी अरविंद मुखेडकर यांना नुकतेच नागपूर येथे 'संगीत भास्कर' या उपाधीने सन्मानित करण्यात आले.

'संगीत ही गोष्ट अवघड आहे.' असा समज सर्वत्र



रूढ असताना अरविंदजी त्यांच्या सेमिनारमध्ये खरंच जर तुम्ही परफेक्ट मेथॉडीकली गेलात तर गोष्टी किती सोप्या असतात हे दाखवून देतात.

''काही वर्षांपूर्वी त्यांचा कवितेचे गाणे तत्क्षणी हा युनिक प्रयोग पाहिला होता ज्यात ते ऑडियन्सने आणलेल्या नवीन व अपरिचित गाण्यांना तत्क्षणी कंपोज, अरेंज व गाऊन प्रेझेंट करतात. यात तीन तासात सुमारे १२-१४ नवीन विविधरंगी गाणी जन्म घेतात. असा त्यांच्या पद्धतीने प्रयोग करणारा दुसरा कोणी भारतात तरी अजून आढळलेला नाही.'' हे जाणकारांचे मत आहे.

मुखेडकर टाइम्स ऑफ इंडियातून रिटायर झाल्यानंतर आता पूर्णत: अगदी २४/७ संगीतात कार्यात मग्न असतात. गेले वर्षी त्यांनी इंडस्ट्रीतल्या १२ नामवंत कलाकारांकडून भारतरत्न व माजी प्रधानमंत्री अटल बिहारीजी वाजपेयी यांचं काव्य कंपोज, अरेंज करून ते स्वत:ही गाऊन अटल सेवा मंच, अंधेरीच्या श्री.अभिजीत सामंत तर्फे मा.आशिषजी शेलार यांच्या हस्ते लोकार्पित केलं आहे.

नुकतंच त्यांचं नागपूरच्या प्रोफेशनल कलाकारांसाठी द म्युझिक नॉलेज मॉल हे दोन दिवसीय क्रिएटिव्ह वर्कशॉप झालं. पूर्वसंध्येचे सेशन व पुढचे पूर्ण दोन दिवस असे सर्व मिळून एकूण १७ तास अरविंदजी एकटे शिकवत होते.

या वेळी त्यांना संगीत भास्कर ही उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले.

अरविंद मुखेडकर यांच्या सर्व उपक्रमांना 'आम्ही पार्लेकर' तर्फे अनेक शुभेच्छा.

## पार्ल्यातील वृक्षवैविध्य

# नेवार

आज आपण ओळख करून घेणार आहोत एका मध्यम उंचीच्या अत्यंत देखणी मंद मादक सुवासिक फुलं येणार्‍या वृक्षाची.

नेवार Baringtonia acutangula Family Lcythidacea विलेपार्ल्यात एअरपोर्ट कॉलनीत तसेच राममंदिर रस्त्यावर अशा दोन ठिकाणी हा वृक्ष आढळतो. पानं चकचकीत व देठ लालसर असतात. वर्षातून तीनदा हा फुलांनी बहरतो. फुले लांब लोंबत्या माळांसारख्या लटक्या फुलोऱ्यात येतात. लाल रंगाची अत्यंत नाजूक मंद मादक सुगंध असणारी फुले संध्याकाळी उशीरा फुलतात आणि सकाळी



गळून पडतात. त्यामुळे त्यांचे सौंदर्य फारसे कोणाच्या लक्षात येत नाही. सकाळी वृक्षाच्या खाली पडलेल्या नाजूक लाल फुलांच्या सड्याचे दृश्य बघणे फार आल्हाददायक असते.

हा खरा नदी ओढ्याच्या काठांवर किंवा समुद्राजवळच्या दलदलीच्या जवळ आढळणारा वृक्ष आजकाल रस्त्याच्या कडेला लावला जातो. फळं लहान असतात. ह्याचे पंचांग औषधात वापरतात. दक्षिण भारतात ह्याचे फळ समुद्रफळ नावाने औषधांत वापरतात. खोड वेदनाशामक



मानले जाते. यकृत, प्लीहा, डोळे यांच्या विकारांवर, कमरदुखी, हिवताप अंशांवर देखील हा गुणकारी आहे. ह्याच्यात बुरशीनाशक गुणधर्म पण आहे. काही ठीकाणी ह्याच्या कोवळ्या पानांची भाजी देखील केली जाते.

नदीकाठच्या झाडी मधुनी
घट्ट आपुली मुळे रोवूनी
पुन्नाग शेरस सवे घेऊनी
उभी राही तटस्थ होउनी
लांब गजरे मस्त माळुनी
लाली चढे फुलाफुलांतुनी
गंध उधळे चहूबाजूंनी
रजनीनाथा नभी पाहूनी
नाथा संगे रात ही सरता
क्लांत होतसे दिशा फाकता
शृंगार सारा तो उतरता
खिन्न उभी घेऊन आर्तता
मोद भान तरीही राखत
लाल सडा खाली पसरत
उभी राहते सोडी ना व्रत
नेवार राती साठी तिष्ठत



फक्त रात्री फुलणारा हा नदीकाठावर पुन्नाग(उंडी) शेरस वगैरे वृक्षां सोबत वाढलेला लहानसा वृक्ष जणू एक ललना आहे, चंद्र हा तिचा प्रियकर आहे, त्याच्यासाठीच जणू ती फुलांचा शृंगार करते अशी कल्पना करून मी ह्या वृक्षावर लिहीलेली एक कविता इथे ह्या लेखनासोबत देण्याचा मोह मला आवरत नाही.



**श्रीकांत सावरकर**
९२२३३१४९०९

# गुरु शिष्य गंडाबंधनाचा सुवर्ण महोत्सवी सोहळा

दिनांक २९ जानेवारी रोजी साठ्ये महाविद्यालयाच्या सभागृहात गुरु उस्ताद झाकीर हुसेन आणि त्यांचे शिष्य पं.श्याम काणे यांच्या गुरु शिष्य नात्याचा सुवर्ण महोत्सवी सोहळा संपन्न झाला. या महोत्सवाचे आयोजन अनुप जोशी व प्रज्ञा देव यांच्या 'संगीत साधना गुरुकुल आश्रम', पूणे या संस्थेने केले होते.



श्याम काणे गेली कित्येक वर्षे अमेरिकेत स्थायिक असले तरी ते मूळचे पार्लेकर आहेत. या कार्यक्रमाच्या वेळी पं. श्याम काणे यांच्या पार्लेकर मित्रमंडळींच्या वतीने नीला रवीन्द्र व



रवीन्द्र भिडे यांनी उस्ताद झाकीर हुसेन व पं. श्याम काणे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. गुरुपूजन सोहळ्यानंतर पं. विजय कोपरकर यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. त्यांच्या गाण्याला तबल्याची संगत श्याम काणे व हार्मोनियमची संगत राहूल गोळे यांनी केली होती. या संपूर्ण संगीतमय कार्यक्रमाचे निवेदन प्रद्युम्न ढवळीकर यांनी केले.

# अमळनेर संमेलनाचा साहित्य सोहळा

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २ ते ४ फेब्रुवारी रोजी अमळनेर येथे संपन्न झाले. प्रताप महाविद्यालयात उभारलेल्या खान्देश कन्या बहिणाबाई चौधरी या मुख्य मंडपात उद्घाटन आणि समारोप समारंभ पार पडला. तसेच काही महत्त्वाचे कार्यक्रम इथे होत होते तर कविवर्य ना. धो. महानोर सभागृह आणि बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे सभागृह येथे इतर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या मुख्य मंडपातील मुलाखतीला श्रोत्यांची गर्दी होती. मात्र कवी कट्ट्यावर कवींनी प्रचंड गर्दी केली होती. गझलकट्टा सुद्धा खास आग्रह करून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात उठून दिसला आणि




ज्याला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला तो परिसंवाद म्हणजे तृतीयपंथीयांच्या समस्यांवरचा. यात सहभागी झालेले दोन तृतीयपंथी आणि काही कार्यकर्ते यांच्या सहभागामुळे श्रोत्यांना खूप वेगळे ऐकायला मिळाले. अशा वेगळ्या विषयावर परिसंवाद ठेवून आयोजकांनी एक वेगळे पाऊल टाकले. दुसरे लक्ष वेधून घेणारे प्रदर्शन होते चित्रकार विजयराज बोधनकर यांच्या ९७ साहित्यिकांच्या अर्कचित्रांचे. बोधनकरांच्या या प्रदर्शनाला रसिकांनी भरभरून दाद दिली.

पार्लेकरांसाठी आनंदाची बाब म्हणजे पार्ले साहित्यकट्टयाचे चार सदस्य या संमेलनात सहभागी झाले होते. लता गुठे प्रकाशक म्हणून आल्या होत्या. चित्रा वाघ यांचा कथाकथनामध्ये सहभाग होता. विजयराज बोधनकरांचे चित्र प्रदर्शन होते आणि अशोक बेंडखळे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे विश्वस्त म्हणून हजर होते.

# गं साजणी......

जर्मन लेखक 'Heinerich Mann' यांच्या १९०५ सालच्या 'Professor Unrat' या कादंबरीवर आधारित जगभरात एकूण पाच चित्रपट तयार झाले त्यापैकी १९३० साली




आलेला जर्मन चित्रपट ‘द ब्ल्यू एंजल’. प्रोफेसर आणि कॅब्रे नर्तिका यांच्या प्रेमाची कथा. ही कथाकल्पना सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते दिग्दर्शक व्ही. शांताराम यांना अतिशय आवडली. त्यांनी या परदेशी कथेला अस्सल ग्रामीण बाजाची डूब दिली आणि चित्रपट तयार केला तो म्हणजे ‘पिंजरा’. तत्त्वनिष्ठ शाळा मास्तर श्रीधरपंत आणि तमाशा नर्तिका चंद्रकला यांच्या प्रेमाची दु:खान्त कथा.



श्रीधरपंत ऊर्फ गुरुजी गावात शाळा चालवतात. मुलांबरोबरच प्रौढांसाठीही प्रौढ शिक्षण वर्ग घेतात. गावाच्या भल्यासाठी, गाव स्वच्छ तसचं चांगल्या मार्गावर राहावं, गावात आरोग्य राहावं यासाठी धडपडत असतात. त्यांच्या मेहनतीचं फळ म्हणून गावाला आदर्श गावाचा पुरस्कार जाहीर होतो. सारं काही चांगलं चाललेलं असताना गावात चंद्रकला या तमासगीरणीचा प्रवेश होतो. गुरुजी तिच्या प्रवेशाला कडवा विरोध करतात. त्यामुळे चवताळलेली ती जिद्दीला पेटते. गावाबाहेर तमाशाचा फड उभा करतेच पण गुरुजींनाही आपल्या नादाला लावते आणि सर्वात शेवटी त्यांच्या हातात तुणतुणं देऊन बोर्डावर उभे करते. व्यक्ती मधल्या आदर्शांची तसंच तिच्या अध:पतनाची ही कहाणी आहे. आज आपण बोलणार आहोत या चित्रपटाच्या श्रेयनामावलीसह सुरुवातीलाच येणाऱ्या गाण्याबद्दल.. ‘गं साजणी’..

पहाटेचं तांबडं फुटतंय, शांत प्रसन्न वेळ आणि अशा वेळेला पडदानशी सारवट गाडी गावात प्रवेश करतेय.पाठच्या गाडीतून घुंगरांच्या तालावर निळू फुले रांगडी साद घालत आहेत. ‘कुन्या गावाची.. कोनच्या नावाची.. कुन्या राजाची तू गं रानी.. गं साजनी..’ यासह पडद्यावर श्रेयनामावली. ऐकणाऱ्याच्या मनाला वेड लावणारं हे गाणं. ‘आली ठुमकत.. नार लचकत.. मान मुरडत हिरव्या रानी..’ हे वर्णन जसं मनातल्या साजणीचं, तसंच खुळखुळ घुंगरांच्या तालावर धुंद थिरकणाऱ्या लावणीलाही उद्देशून असू शकतं. जी गावात सर्वांच्या मनावर मोहिनी घालायला प्रवेश करते आहे. गंमत म्हणजे गाणं संपेपर्यंत आपल्याला या साजणीचं दर्शन घडत नाही. फक्त बंद पडदा दिसतो जो गाण्याच्या शब्दांसह उत्कंठा वाढवत जातो.

गीतकार जगदीश खेबुडकर यांचा एक एक शब्द शृंगारात भिजलेला. पण कुठेही अश्लीलतेचा स्पर्श नाही. मनातल्या साजणीचं रांगड्या भाषेतलं चित्रं. तेवढीच सुंदर चाल संगीतकार राम कदम यांची. व्ही. शांताराम यांचं उत्कृष्ट दिग्दर्शन. गाणं गायलं आहे विष्णू वाघमारे यांनी. त्यांना ‘वाघ्या’ याच नावाने संबोधत असत. ते कोल्हापुरातील फिरंगाई तालीम भजनातील गायक होते. अतिशय रांगडं असं हे गाणं तशाच अस्सल मराठमोळ्या मातीतील कलाकाराकडून गाऊन घ्यावं असं सर्वांचं मत पडलं. तो योग्य गायक होता, वाघ्या. मराठीतील उत्कृष्ट शृंगारगीतांपैकी हे एक आहे याबद्दल शंका नाही. त्यानंतरही वाघ्या यांनी ‘आली गं आई आली ग’, ‘पांडोबा पोरगी फसली’ अशी काही गाणी गायली आहेत.

‘पिंजरा’ या चित्रपटात एकूण अकरा गाणी आहेत. सारी जगदीश खेबुडकर यांनी लिहिलेली आणि राम कदम यांनी संगीत दिलेली. व्ही.शांताराम यांना हा सिनेमा संगीत प्रधान करायचा होता. त्यामुळे त्यांनी गाण्यांवर विशेष लक्ष दिलं. राम कदम यांनी एकूण शंभर चाली रचल्या. खेबुडकरांनी एकशे दहा गाणी लिहिली. ज्यापैकी अकरा या चित्रपटात आली. वाघ्या यांचं गाणं सोडून बाकी गाणी उषाताई, लताबाई आणि सुधीर फडके यांनी गायली आहेत.

चित्रपटातील निळू फुले यांची भूमिका आजवरच्या भूमिकांहून वेगळी होती. मुख्य भूमिकेत डॉक्टर श्रीराम लागू आणि अभिनेत्री संध्या शांताराम सोबत वत्सला देशमुख. तोपर्यंत रंगमंच गाजवलेले अभिनेते डॉक्टर लागू यांचा हा पहिला चित्रपट. तमाशा कलावंतीणीची भूमिका असल्यामुळे नृत्यांवर संध्या बाईंनी खूप मेहनत घेतली होती. सारी नृत्यं त्यांनी स्वत: कोरीओग्राफ केली आहेत.

मराठी चित्रपट सृष्टीतील एक माईलस्टोन असं या चित्रपटाचं वर्णन करता येईल. ‘व्यक्ती मेली तरी चालेल पण आदर्श जिवंत राहिले पाहिजेत’ अशी कथेतील सामाजिक जाणीव लक्षात घेता दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते. आधुनिक तंत्रज्ञान, मराठीतील पहिला रंगीत चित्रपट, सामाजिक आशय, गाणी, कथा, संवाद अशा सगळ्याच पातळ्यांवर चित्रपट सरस होता. दणक्यात चालला. १९७२ सालचा उत्कृष्ट चित्रपटासाठीचा राष्ट्रीय पुरस्कार या चित्रपटाला मिळाला.



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

# एक पाऊल कलागुणांकडे

आता मुलांना करिअर करण्यासाठी असंख्य क्षेत्र उपलब्ध आहेत. पूर्वीसारखं ‘कमी टक्केवारी मिळाली म्हणून आर्ट्स ला जा.’ असं होत नाही. उलट ९८ / ९९% मिळूनही आवर्जून मुलं आर्ट्सला जातात.

पण तरी अजून आपल्याकडे कले पेक्षा अभ्यासाला जास्त महत्त्व दिलं जातं. शाळेतही इतर विषयांच्या स्पर्धा परीक्षांना जास्त महत्त्व असतं. पण टक्केवारी, अभ्यास याबरोबरच कलेलाही तेवढीच दाद व प्रोत्साहन मिळाले पाहिजे. चित्रकला हा पर्यायी विषय न ठेवता कंपल्सरी विषय करायला हवा.




जेव्हा एखादं मूल बोलायलाही लागलेलं नसतं किंवा त्याला लिहिता वाचता येत असतं तेव्हा त्याच्या हातात एखादा खडू, क्रेऑनचे रंग मिळाले तर ते मिळेल त्या पृष्ठभागावर काहीतरी गिरवतं , खरडवतं त्यावेळी त्याला ‘लादी खराब होईल’ , ‘भिंत खराब होईल’ म्हणून न रोखता त्याला त्या रंगांबरोबर खेळू दे, एकरूप होऊ दे , त्याचा स्पर्श अनुभवू दे . त्यानी गिरवलेल्या त्या कृतीतून ते



स्वत:ला व्यक्त करत असतं. त्याला प्रोत्साहित केलं पाहिजे, घरातील एखाद्या कोपऱ्यातील एक भिंत खास त्यासाठी राखून ठेवली पाहिजे. प्रोत्साहन, कौतुक हे मुलांची निरोगी वाढ होण्यासाठी फार महत्त्वाचे आहे.

मुलं जरा मोठी झाल्यावर ते जे काही काढतील ते समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्यातल्या चांगल्या गोष्टी नमूद करा आणि मग हळूहळू त्यात असलेल्या कमतरता, चुका हळुवारपणे त्याला समजवा. मुलांमध्ये चित्रकले विषयी गोडी निर्माण करायला हवी त्यासाठी त्यांना वेगवेगळी चित्रांची पुस्तकं बघायला, वाचायला द्यायला पाहिजे त्याचबरोबर वेगवेगळी रंगांची माध्यमं त्यांना हाताळायला दिली पाहिजेत. त्या रंगांशी त्यांना एकरूप होऊ द्यावं. त्या रंगांनी त्यांचे हात भलेही बरबटू दे पण त्याचा अनुभव त्यांना घ्यायला दिला पाहिजे. अशानी त्यांच्यात त्या विषयाची गोडी , आवड विकसित होईल. चित्र प्रदर्शनाला नेऊन त्यांना वेगवेगळ्या चित्रकारांची चित्र दाखवायला हवीत. त्यातली रंगसंगती ,त्यातले बारकावे त्यांना समजवायला हवेत.

मुलांसाठी कला ही एक घरगुती ’उपचार पद्धत’ आहे.

जेव्हा मूलं हाताच्या बोटांमध्ये क्रेऑनचे रंग धरून रंगवत असतात त्यावेळी तो त्यांच्या बोटांच्या स्नायूचा एक प्रकारचा व्यायाम असतो. त्यामुळे त्यांचे बोटांचे मसल्स बळकट होतात तसेच त्यामुळे ’हॅन्ड अँड आय कोऑर्डिनेशन’ वाढायला मदत होते.



हा माझ्या मुलाच्या बाबतीत मला आलेला अनुभव आहे. काही वेळेला एखादं मुल फळ्यावरचं सलग वाचू तर शकतं पण ते वाचलेलं वहीत लिहिणं त्यांना जमत नाही, त्यांचा स्पीड कमी पडतो.

पण सुरुवातीपासून माझ्या मुलाला चित्रकलेची आवड होती. त्यामुळे तो तासनतास चित्र काढत बसायचा. अगदी बारकावे जपत चित्र काढायचा आणि हळूहळू त्यामुळे त्याचं कॉन्सन्ट्रेशन वाढत गेलं.

एकाच गोष्टीवर आपण जेव्हा लक्ष केंद्रित करतो, त्यावेळी आपण त्यातल्या छोट्या छोट्या तपशीलांवरही नीट लक्ष देऊ लागतो. त्यामुळे मेंदूची सर्जनशीलता विकसित होण्यास मदत होते. सर्जनशीलता आणि प्रतिक्रिया विकसित होते. ‘आपल्याला काय सुधारणा केल्या पाहिजेत’ हे त्यांना स्वत: चे स्वत: लाच लक्षात यायला लागते.

चला तर मग, आता ‘स्काय इज द लिमिट’ कुठलाही पृष्ठभाग तुमचा कॅनवास बनवा आणि स्वत:ला व्यक्त करा कुठल्याही बंधनात न अडकता कोणत्याही माध्यमात, रंगात स्वत:ला झोकुन द्या.

आता पुढील काही भागात आपण रंगाच्या वेगवेगळ्या माध्यमांची ओळख करून घेणार आहोत तसेच चित्राची वेगवेगळी अंग आपण जाणून घेणार आहोत.



प्रज्ञा राजे
९८२१२५९८८७

# Business Opportunities in Cyber Security

In today's world the computer age has brought in immense opportunities for new businesses. Whenever businesses become successful, there are risks of unlawful thefts and one needs to guard against that. In this digital world the most important assets are data and information. In addition to the thefts, the risks today are very high as many businesses completely depend on digital presence. Any outage can disrupt and drive a company out of business. In addition, leakage of sensitive data can lead to multiple class action law suits which can make any company bankrupt instantly. The importance of cyber security has thus given rise to a completely new kind of business.




The cyber security business is growing at a great speed and is expected to be about $215 Billion (About Rs. 16 lakh crores) in 2024.



The computer era began in 1950s but 1980s really saw a great leap with internet and world wide web introduction in 1990s. This led to a sudden increase in viruses, malware, worms, and sinister programs that were used to steal data and information or simply to blackmail users. A very popular virus in the eighties was Vienna virus. Bernd Fix, a German Cyber Security expert, discovered that this Vienna Virus infected his device. He created a software that helped find and remove the Vienna virus. This can be considered as a first and best example of creation of modern antivirus software.

From the nineties, the world wide web is being used extensively. A virus started spreading through Outlook inboxes called Melissa virus, which came into existence in 1999. It started spreading rapidly in cyberspace, causing severe damage. There have been multiple large scale and very sensitive hackings in the past and security systems must always play a catch-up game. In the 2010-2020 decade following breaches are known to have shaken the world.

A Saudi hacker 0XOMAR published a list of 400000 credit card numbers in 2012.

All of us know "Edward Snowden" who published US govt National Security Agency data in 2013

In 2013-14 Yahoo was hacked and all 3 billion users' personal data was published by hackers.

In 2017 a virus named WannaCry infected multiple computers at once.

And many more and many yet to come....

In view of the above threats the industry has responded with multiple strategies. The simple plan for all is to ensure working on detection, response, and prevention of attacks. To ensure security every company needs to fortify its digital infrastructure and constantly be on alert mode. This work has given rise to a huge ongoing business opportunity for multiple companies and individuals to work in this specialized area.

The most well-known companies in this space are Palo Alto Networks, McAfee, CrowdStrike, Deepwatch, Rapid7 etc. to name a few. Companies like IBM and MicroSoft have special focus on security with their products.

India boasts of a huge tech trained manpower and has benefited hugely by business in this area. Most of India based IT services companies like TCS, Infosys etc. have specific offerings in IT security. There is always a great scope for all young engineers to acquire this special skill and make a great career. Typical coding in IT software can get you a job but knowledge in IT security can make an individual a sought-after asset.

We can look at specific areas of work in the broad term IT and Cyber security in next article.



**मिलिंद जोशी**
९८१९७ ९७२५८

# 'MONEYSMART'

वयोगट ७ ते १७ वर्षे हा गट आपल्या देशातील अर्थसाक्षरतेत सर्वात तळातल्या पातळीवर आहे ही काळजी व खेदाची बाब आहे. हा वयोगट शाळा अथवा ज्युनियर कॉलेजमध्ये अद्याप फॉर्मल शिक्षण घेत असतो म्हणून त्यांच्या पालकांना असे वाटते की परीक्षा बाह्य विषयात आपल्या पाल्याने लक्ष घालू नये, फार तर एखाद दुसरा बैठा अगर मैदानी खेळ आणि एखादी कला उदा. गायन, वाद्यवादन, चित्रकला इत्यादीमध्ये थोडा बहुत रस घ्यायला हरकत नाही. हा पालक वर्ग शालेय शिक्षणाच्या विज्ञान, गणित, संगणकशास्त्र अशांसारख्या विषयात आपल्या मुलांना विशेष प्राविण्य मिळावे म्हणून जीवाचे रान करीत असतो व पाल्यासाठी फक्त उत्तम शाळा महाविद्यालयात प्रवेश घेऊन न थांबता हजारो रुपये खर्च करून अशा विषयांची वेगळी खास शिकवणी लावली जाते. सांप्रतच्या एक दोन अपत्यांच्या जमान्यात तर मुलांपुढे सर्व सोई, सवलती हात जोडून उभ्या केल्या जातात. मुलांच्या जवळजवळ सर्वच मागण्या प्राधान्याने पुरवल्या जातात त्यामुळे त्यांचा असा समज होऊ लागतो की पैसा मिळवणे व मनात येईल तसा खर्च करणे हे खूपच साधे, सरळ व सोपे काम आहे. विशेषत: पौंगडावस्थेमध्ये ही भावना प्रबळ होताना दिसते मात्र आपले पालक अर्थार्जनासाठी घेत असलेली मेहनत व कष्टांची जाणीव त्यांना होऊन त्याला पूरक अशी आपली वागणूक ठेवण्याची समज व वृत्ती त्यांच्यात येणे जरुरीचे आहे. पाश्चात्त्य देशात विशेषत: अमेरिकेत मात्र जरा वेगळी परिस्थिती आहे तेथे या वयोगटाला अर्थभान येण्यासाठी खूप छान रिसोर्सेस उपलब्ध आहेत व त्या दिशेने जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसून येतात तेथील अगदी प्राथमिक शालेय इयत्तेपासून मुलांना रंगीत चित्रमय पुस्तकातून गाणी, गोष्टी, कोडी (Quizz) तसेच छोट्या - छोट्या ॲनिमेटेड व्हिडिओ क्लिप्स इ. द्वारे अर्थसाक्षर करण्याचा स्तुत्य प्रयत्न होताना दिसतो व यात कोठेही रटाळपणा न येता मनोरंजनातून हे साध्य होताना दिसते. यासंदर्भात एक नमुना म्हणून www.easypeasyfinance.com या वेबसाईट कडे पाहता येईल. आपल्याकडे मात्र अनेक मुले बराचवेळ निव्वळ कार्टून, पबजी सारखे व्हिडिओ गेम्स अशात रममाण होताना दिसतात. हे चित्र बदलणे जरुरीचे आहे व वर उल्लेख केल्याप्रमाणे अशा प्रकारची मुलांना अर्थसाक्षर बनविण्याची व खास करुन भारतीय वातावरणाला पूरक अशी विविध साधने कल्पकतेने निर्माण करून ती रास्त किंमतीत पुरेशा प्रमाणात मुलांसाठी सहज उपलब्ध करून देणे हे एक आव्हानात्मक काम आहे. मात्र हे करताना मुलांच्या वयानुसार त्यांच्या बुद्धिला झेपेल, पचेल तेवढेच हळुवारपणे त्यांना कंटाळा येणार नाही अशा बेतानेच करणे योग्य होईल. अशातऱ्हेने त्यांच्या मनाची यासंदर्भात मशागत होत राहिल्यास पुढे ती जाणत्या वयात आल्यानंतर त्यांना अधिक फॉर्मल प्रशिक्षणाद्वारे उत्तम प्रकारे अर्थसाक्षर बनविणे सोपे असेल. भारतीय रिझर्व बँक, सेबी व केंद्रीयशासनाअंतर्गत काही आस्थापनांनी मुलांसाठी या दिशेने काही चांगले प्रयत्न केलेले दिसतात पण ते अजून पुरेशा प्रमाणात लोकप्रिय होऊन खालपर्यंत झिरपलेले दिसत नाहीत.




निदान विलेपार्ले सारख्या सुप्रसिद्ध शैक्षणिक उपनगरातील ख्यातनाम शाळा व महाविद्यालयांनी ही बाब गंभीरपणे घ्यावी असे वाटते. याबाबतीत ज्या कोणाला आस्था, कळकळ असेल त्यांनी एकत्र येऊन पुढाकार घ्यावा व या बऱ्यापैकी दुर्लक्षित विषयात काय करता येईल याचा विचार विनिमय करावा ही वेळ आली आहे. आपली पुढची पिढी अगदी लहान वयापासून हळूहळू योग्य रितीने कशी अर्थसाक्षर होईल व पुढील जीवनातील येणाऱ्या आर्थिक आव्हानांना समर्थपणे कशी सामोरे जाईल हे पाहणे अगत्याचे आहे.



**प्रकाश जोशी**
मो. ९९२०३३४७६२

# सत्यशोधक चित्रपटाचे यश

'स्त्रियांनी शिक्षण घेतलंच पाहिजे.' असा ठाम विचार मांडून शिक्षणाचे महान कार्य करण्यामध्ये ज्यांचा महत्त्वाचा वाटा आहे असे महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले. यांच्या जीवनावर आधारित 'सत्यशोधक' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. महापुरुषांचा इतिहास




आपल्या मुलांना कळवा यासाठी पालक आपल्या मुलांबरोबर आणि शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसमवेत हा चित्रपट पाहायला येत आहेत.

विशेष म्हणजे न्युझीलंड ची राजधानी वेलिंग्टन आणि ऑस्ट्रेलियामध्ये मेलबर्न येथे या चित्रपटाचा रेड कार्पेट प्रीमियर सोहळा फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात होणार आहे. परदेशात देखील हा मराठी चित्रपट प्रदर्शित होतोय.

या चित्रपटात महात्मा फुले यांच्या भूमिकेत अभिनेते संदीप कुलकर्णी आहेत तर सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अभिनेत्री राजश्री देशपांडे आहेत. त्याचप्रमाणे गणेश यादव ,सुरेश विश्वकर्मा, रवींद्र मंडळी हे कलाकार देखील या चित्रपटात आहेत.हा चित्रपट रिलायन्स एंटरटेनमेंट मार्फत प्रदर्शित झाला आहे.

समता फिल्म्स निर्मित अभिता फिल्म प्रोडक्शन प्रायव्हेट लिमिटेड प्रस्तुत आणि निलेश जळमकर लिखित दिग्दर्शित सत्यशोधक चित्रपटाचे निर्माते प्रवीण तायडे, पप्पा बोराटे ,भीमराव पट्टेबहादुर, सुनील शेळके ,विशाल वाहुरवाघ हे आहेत. संकल्पना राहुल तायडे आणि वैशाख वाहूरवाघ यांची आहे. सहनिर्माते राहुल वानखडे, बाळासाहेब बांगर, हर्षा तायडे, प्रतीका बनसोडे आणि प्रमोद काळे आहेत. चित्रपटाच्या निर्मितीमध्ये निखिल पडघन ,देवानंद मोहोळ, मंगला वानखडे आणि नीता गवई यांचे मोलाचे योगदान आहे.हा चित्रपट रिलायन्स एंटरटेनमेंट मार्फत प्रदर्शित झाला आहे.

मनोरंजन विश्व

# शिवरायांचा छावा

गेले काही वर्ष ऐतिहासिक चित्रपटांची अधिकाधिक निर्मिती होत आहे आणि त्या निमित्ताने नव्या पिढीला देखील इतिहास अभ्यासता येत आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'शिवरायांचा छावा' हा चित्रपट याच महिन्यात प्रदर्शित होत आहे. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचं अवघं आयुष्य एक धगधगतं अग्निकुंड म्हणावं लागेल. मोठ्या पडद्यावर संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडण्याचं शिवधनुष्य दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी उचललंआहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या धगधगत्या अजेय पराक्रमाची कथा दिग्पाल लांजेकरांनी लिहिली असून पटकथा-संवाद आणि गाणी देखील त्यांचीच आहेत. गाण्यांना साजेसं संगीत युवा संगीतकार देवदत्त मनीषा बाजी यांनी दिलं आहे. पार्श्वसंगीत अमर मोहिले यांचे आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत भूषण पाटील आहे. भूषण सांगतो ,'स्वराज्यनिष्ठा, शौर्य, धैर्य अशा अनेक अंगाने स्वराज्याच्या संरक्षणासाठी संभाजीराजांनी स्वत: मरणांतिक यातना सहन करून, स्वराज्याला जीवनदान देणाऱ्या अशा या महान पराक्रमी राजाची भूमिका साकारायला मिळणं ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.' हा चित्रपट १६ फेब्रुवारीला प्रदर्शित होत आहे.






गणेश आचवल
९८२१२६८३९१


# पार्ले डिरेक्टारी २०२४

## पाल्यर्याची आगळी वेगळी सेक्शन वाईज डिरेक्टारी




सामान्य नागरिक आणि जाहिरातदार यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे गेली अनेक वर्षे townparle.in पार्लेकरांसाठी डिरेक्टरी प्रकाशित करत आहे. यावर्षीची डिरेक्टरी विलेपार्लेतील नामांकित townparle.in, parlebazaar.com, आणि www.parlekar.com (आम्ही पार्लेकर) या व्यासपीठांद्वारे प्रकाशित करण्यात येणार आहे. ही डिरेक्टरी छापील तसेच डिजिटल स्वरूपात देखील उपलब्ध होणार आहे.

या डिरेक्टरीद्वारे आता घरात लग्न असो व सहलीला जायचे असो की एखाद्या बँकेचा, एजंट चा नंबर हवाय, की आजारी पडला आहात आणि डॉक्टर, केमिस्ट चा नंबर हवाय, किंवा अगदी इलेक्ट्रिशियन, प्लंबर हवाय काही चिंता नको आता या सगळ्या गोष्टी इकडे तिकडे शोधत बसायची गरज नाही. डिरेक्टरी उघडा आणि माहिती घ्या एका क्षणात !!

पार्ल्याच्या ह्या डिरेक्टरीत पार्ल्याची सेक्शन वाईज माहिती दिली आहे. जसे finance मध्ये banks, insurance agents, education मध्ये schools, colleges, coaching classes, matrimony मध्ये caterers, decorators, jewellers etc..., travel मध्ये tour operators, travel agents etc.., health मध्ये doctors, hospitals etc... अशा प्रकारे fashion, construction, computers, social institutions ही आणि अशी अनेक सेक्शन्स आहेत.

ही डिरेक्टरी एप्रिल २०२४ च्या शेवटी प्रकाशित होणार असून याच्या ८००० आवृत्ती छापण्यात येणार आहेत. ही डिरेक्टरी पार्ल्यातील बुक स्टॉल आणि विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मसह सर्व पेपर स्टॉलवर उपलब्ध असणार आहे. या डिरेक्टरीचं प्रमोशन तीनही प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया, बॅनर इत्यादींद्वारे करण्यात येणार आहे.

या डिरेक्टरी मध्ये जाहिरात द्यायची असल्यास अथवा डिरेक्टरी Pre- Book करायची असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधू शकता. 9324875463 / 8169825961 / 9769261182

याबद्दलची संपूर्ण माहिती वाचण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा किंवा दिलेला QR CODE स्कॅन करा.
https://parlebazaar.com/parle-directory-2024